स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विद्या शाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती

(पीएच. डी) पदवीसाठी शोध प्रबंधाची रूपरेषा

*** संशोधन अभ्यासाचा विषय ***

<u>“उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्या: एक समाजशास्त्रीय अध्ययन”</u>

<u>(विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)</u>

-: संशोधक :-

भाग्यशाली अर्जुन घोंगडे

एम. ए .समाजशास्त्र बि.एड, एम.एड

सामाजिक शास्त्र संकुल , स्वा. रा. ती. म.विद्यापीठ , नांदेड

-:मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. टी. आर . फिसफिसे

सहाय्यक प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख,

श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी

सप्टेंबर २०२२

“उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्या, एक समाजशास्त्रीय अध्ययन” (विशेष संदर्भ- हिंगोली जिल्हा)

<u>प्रस्तावना:-</u>

भारत हा देश लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाहीमुळे भारतात सर्वांना समानतेची वागणूक दिली जाते.त्यामुळे स्त्री-पुरुष हा भेदभाव केला जात नाही, परिणामी महिला ह्या पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात कार्य करताना पहावयास मिळतात. सुरुवातीला या प्रश्नाची सोडवणूक होणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणात दोन गोष्टी विचारात घ्याव्या लागतील त्यातील एक म्हणजे शिक्षणाची पातळी आणि दुसरी म्हणजे विषय उपलब्धता ह्या गोष्टी महत्वाच्या ठरतात. शिक्षणाच्यापातळीत पदवी किंवा पदव्युत्तर अशा स्वरूपाचे तर दुसरे म्हणजे शिक्षणासाठी असलेले महाविद्यालयीन विषय जसे कला, वाणिज्य, विज्ञान, उद्योग व्यवस्थापन, वैद्यकशास्त्र, कायदा, इत्यादी. शिक्षणाचा विचार करता येईल. उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेबद्दल शिक्षणतज्ञ, शास्त्रज्ञ नेहमीच ऊहापोह करीत असतात उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढ करण्यासाठी शिक्षणतज्ञ, शास्त्रज्ञांनी अनेक समित्या नेमल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने राधाकृष्णन समिती, कोठारी आयोग, नॅशनल कमिशन फॉर टीचर्स, नॅशनल पॉलिसी ऑफ एज्युकेशन, इत्यादी. शिक्षणाचे एक धोरण म्हणजे

उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यावर भर देणे, रोजगार निर्माण करणे,उच्च विचाराची कल्पना करणे होय. शिक्षक विद्यार्थ्यांना वेगवेगळया विषयाची ओळख करून देणे, बुद्धी वृन्दिगत करणे, प्रत्येक विद्यार्थ्याला स्वावलंबी आणि समाजाचा एक प्रामाणिक, उत्तम नागरिक म्हणून तयार करीत असत तसेच विद्यार्थी हा चारित्र्यसंपन्न करणे हेही शिक्षकांचे मुख्य कर्तव्य होते. प्राचीन काळी शिक्षणा व्यतिरिक्त कोणत्याच गोष्टीला महत्त्व नव्हते आणि राजकारणापेक्षा शिक्षणालाच जास्त महत्त्व होते. शिक्षणासाठी अनेक समाजसुधारकानी कार्य केले. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीबाई फुले, राजश्री शाहू महाराज, इत्यादींनी विशेषकरून स्त्रियांच्या शिक्षणासाठी मोलाचे योगदान दिलेले आपण पाहतो. शिक्षण हे समाज परिर्वतनाचे साधन आहे. जो समाज अशिक्षीत असतो तो शिक्षणाअभावी सर्वस्व गमावलेला असतो. शिक्षणाचे हक्क आणि कर्तव्याची जाणीव करुन एक सुजान नागरीक म्हणून जिवन जगता येते. म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणाचे महत्व सांगताना **"शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे.जो पिईल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही". सोप्या भाषेत सांगितले आहे.** जे व्यक्ती बौध्दीकदृष्टया उच्च शिक्षणाचा लाभ धेण्यास समर्थ आहे. परंतु त्यांचे आर्थिक परिस्थिती बेताची नसल्यामुळे किंवा इतर समस्ये मुळे विद्यार्थीनी शिक्षणाच्या लाभापासुन वंचित आहे. त्यांना उच्च शिक्षणाच्या सोई सुविधामध्ये विद्यापीठ हे एक स्थापन केले आहे. उच्च शिक्षण म्हणजे महाविद्यालय विद्यापीठ किंवा इतर मोठ्या शैक्षणिक संस्थेत इयता १२ वी पुढील शिक्षण त्यात पदवी, पदव्युत्तर, पदविका इत्यादी शिक्षण दिले जाते. आज घडीला समाजात उच्च शिक्षण

घेणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढलेले आहे ती क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांची देण असल्याचे आपण सांगू शकतो.पूर्वी च्या काळी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण कार्य करत असताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले होते. सध्यास्थितीतही मुलींना शिक्षण घेतांना विशेषत: उच्च शिक्षण घेतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.याच

समस्याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषय शोध निबंधासाठी निवडले गेले आहे.

अभ्यास विषयाची निवड:-

प्रस्तुत संशोधनात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या सामाजिक, आर्थिक, वैयक्तिक जीवनाचा अभ्यास करून त्यांना उच्च शिक्षणात येणाऱ्या समस्यांच्या विषयाने आभ्यास विषय म्हणून **“उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्या: एक समाज शास्त्रीय अध्ययन”** (विषेश: संदर्थ हिंगोली जिल्हा) ह्या विषयाची निवड केली आहे.

अभ्यास विषयाची व्याप्ती व मर्यादा:-

संपूर्ण महाराष्ट्र हे अभ्यासाच्या दृष्टिने अतिव्यापक क्षेत्र असल्यामुळे संबंधित संशोधनात मर्यादित विषय संदर्भ म्हणून हिंगोली जिल्हयाची निवड केली आहे. यामध्ये हिंगोली जिल्हयातील हिंगोली, कळमनुरी, औंढा (नाग.) , वसमत, सेनगाव

इत्यादी तालुक्यातील महाविद्यालयांच्या एकुण 200 उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

<u>संशोधन विषयाचे महत्त्व:-</u>

उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्या या विषयाचे महत्त्व पाहत असता आपणास शिक्षणाचे देखील महत्त्व जाणून घेणे गरजेचे आहे. शिक्षणाचे महत्व ओळखणाऱ्या बाबासाहेबांनी 20 जुन 1946 साली मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालय आणि 19 जून 1950 साली औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली.

।।विद्याविना मती गेली, मतीविना नीती गेली।।

।।नितीविना गती गेली, गती विना वित्त गेले।।

।।वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले।।

या रचनेतुन महात्मा ज्योतिराव फुले. यांनी शिक्षणाचे महत्व सांगीतले आहे.

भारतातील समाजात उच्च शिक्षणाला महत्त्व प्राप्त होते. महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राजाराम मोहन राय, महर्षी धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, या सर्वांनी उच्च शिक्षणासाठी संघर्ष केला आहे आणि स्त्रियांच्या **“चूल आणि मुल”** या वृतीला बदलून मुलीना शिक्षण दिले आहे. आजच्या काळात उच्च शिक्षण घेण्यापर्यंत मुलीना अनेक समस्या दिसून येतात. प्राचीनकाळात

फक्त शिक्षण घेण्यासाठी मुलींना संधी नव्हती शिक्षणासाठी त्यांना बाहेर जाऊ दिले जात नव्हते हे पाहून महात्मा फुले यांनी मुलींसाठी १ जानेवारी १८४८ रोजी पहिली शाळा सुरु केली व "**सावित्रीबाई फुले यांनी स्वतः शिकून मुलींना शाळेत शिकविण्याचे काम केले**" यांच्या प्रयत्नामुळेच आज उच्च शिक्षणा पर्यंत मुली पोहचल्या आहेत.

उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते जसे की महाविद्यालयात जात असताना रस्त्याने मुले त्यांना पाहून टिंगल टवाळया करतात, कधी-कधी छेडछाड करतात त्यामुळे मुलिंसह त्यांच्या घरच्यांना काळजी युक्त जीवन जगावे लागते. तसेच वस्तीगृहात राहणाऱ्या मुलींना देखील अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मुलींना गावी महाविद्यालय नसल्यामुळे त्यांना शहराच्या ठिकाणी शिकण्यास पाठवले जाते, बसमध्ये देखील त्यांच्याकडे पाहून टोमणे मारणे, गाणे म्हणणे इत्यादी. प्रकार घडताना पहावयास मिळतात. या समस्या सामाजिक समस्यात येतात घरची हलाखीची परीस्थीती, गरिबी ह्या आर्थिक समस्या तसेच घरातील मुलगा शिकवा मुलीला जास्त शिक्षण नको हि मानसिकता ह्या कौटुंबिक समस्या अशा अनेक समस्या मुलींच्या उच्चशिक्षणात प्रमुख अडथळा ठरला आहे यासर्व समस्यांचा अभ्यास व्हावा व मुलींना उच्चशिक्षण घेणे सुलभ – सुकर व्हावे यासाठी प्रस्तुत विषयांचे महत्व आहे. भारतात ऋग्वेद काळापासूनच महिलांना कुठलेच अधिकार नव्हते महाभारताच्या काळात ही आर्यांच्या गटांमध्ये देखील स्त्रियांवर शैक्षणिक बंधने होती. प्राचीन काळापासून ते स्वातंत्र्य पूर्व काळापर्यंत महिलांची अधिकाराची भूमिका ही पुरुषांवरच अवलंबून होती. १९४७ स्वातंत्र्य

नंतर यातून महिलांना स्वतःची व समाजात मोलाचे स्थान निर्माण करण्याची संधी हि शिक्षणाने बहाल केली आहे, शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहून समाजात मान सन्मानाने जीवन कार्यात. प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण घेऊन मुली ह्या उच्च पदावर सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत ते केवळ शिक्षणामुळे शक्य झाले आहे.

<u>संशोधन विषयाची उद्दिष्टे:- (Objectives of Research)</u>

1. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्यांचा अभ्यास करणे.
2. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या कौटुंबिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
3. उच्च शिक्षणाविषयीचा मुलींचा दृष्टिकोन अभ्यासणे.
4. उच्च शिक्षणातील मुलीच्या समस्येवर उपाय सुचवणे.
5. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शैक्षणीक सोयी सुविधांचा अभ्यास करणे.
6. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या विवाह विषयक समस्येंचा अभ्यास करणे.

<u>संशोधनाची गृहीतके:- (Hypothesis)</u>

1. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा समस्यांना तोंड द्यावे लागते.
2. उच्च शिक्षण घेण्याचा मुलींची आर्थिक परिस्थिती हालाकीची आहे.
3. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचा कल अधिक आहे.

4. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी सद्यस्थिती सोयी सुविधांचा मोठा अभाव आहे.
5. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्येवर प्रभावी उपाययोजनांची गरज आहे.
6. समाजात बहुतांश मुलींना उच्च शिक्षण घेण्याऐवजी विवाहास प्राधान्य दिले जाते.

संशोधनाची नमुना निवड पद्धती:-

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड पध्दतीचा वापर करुन हिंगोली जिल्हयातील विविध तालुक्यातुन उच्च शिक्षण घेणाऱ्या संशोधन मानव विद्याशाखेतील संशोधन पद्धतीवर आधारित आहेत. विविध निकषांच्या आधारे प्रतिनिधीक स्वरुपात नमुना म्हणून निवड केली जात आहे. एकुण जिल्हयातील 200 मुली उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची निवड करुन त्यांच्या कडून तथ्य संकलित केली जाते.

<u>तथ्य संकलन पद्धती :-</u>

तथ्य संकलन हे संशोधनातील महत्त्वाचे कार्य आहे. प्रस्तुत संशोधनाच्या तथ्य संकलनासाठी संशोधांचे क्षेत्र जिल्ह्याचे महत्व, स्वरूप, व्याप्ती, मर्यादा आणि उदिष्ट नुसार योग्य असे प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत:- (Primary Sources)

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्थ संकलन पध्दतीतील प्राथमिक तथ्थ संकलन या पध्दतीचा वापर करुन नमुना म्हणून निवडलेल्या मुलीकडून प्रत्यक्ष रुपात प्रश्नावली, मुलाखत, अनुसुची या तंत्राद्वारे तथ्थ संकलीत केली जातील.

दुय्यम स्त्रोत:- (Secondary Sources)

तथ्य संकलनाच्या द्वितीय स्त्रोतांमधून मिळणारी माहिती ही संशोधन विषयासाठी सूक्ष्म व महत्त्वाची असते दुय्यम स्त्रोतांमध्ये संबंधित विषयावरील महत्त्वपूर्ण ग्रंथ मासिके नियतकालिके लेख शासकीय परिपत्रके तसेच इंटरनेट न्यूज चॅनेल बातम्या इत्यादींचा आधार प्रस्तुत संशोधकासाठी घेण्यात येणार आहे. प्राथमिक तथ्याला एक पुरावा म्हणून दुय्यम स्त्रोतांचा वापर केला जाईल.

प्रकरणाची रुपरेषा

प्रस्तूत संशोधनाची प्रकरण निहाय रुपरेषा ठरविण्यात आलेली आहे.

<u>प्रकरण पहिले</u>

<u>संशोधन विषयाची पार्श्वभूमी</u>

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाची पार्श्वभूमी ज्यामध्ये पूर्वीची शिक्षण पध्दती, स्वातंत्र्य पूर्व परीस्थीती विविध शिक्षणविषयक आयोग, लोकशाही शासन व्यवस्तेतील सर्वाना समानता धोरण, मुलीना '**प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे**' यामध्ये मुलींचे प्राथमिक व माध्यमिक व उच्च शिक्षण आहे या संदर्भातील माहितीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासाविषयीची निवड, अभ्यासाविषयीची व्यापती व मर्यादा, अभ्यासाची उद्दिष्टे, गृहितकृत्ये, नमुना निवड पध्दती, तथ्थ संकलन, अभ्यास विषयाचे महत्तव इत्यादी वरील अभ्यास करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण तिसरे</u>

<u>कौटुंबिक व आर्थिक जीवन</u>

प्रस्तुत प्रकरणात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची कौटूंबिक परिस्थिती, कौटूंबिक समस्या, आर्थिक परिस्थिती, आर्थिक समस्या, उपलब्ध सोयिसुविधा इत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे

उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्येवर उपाय योजना

प्रस्तुत प्रकरणात शिक्षण विषयक कुटुंब व समाजाचा कल शिक्षण घेण्यात येणाऱ्या अडचणी, समाजातील स्थान, सामाजिक बंधने, सामाजिक व शैक्षणिक समस्या इत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधन समस्येच्या माध्यमातून येणाऱ्या अनेक शिफारशींचा अभ्यास करण्यात येणार आहे. आणि या शिफारशीवरून निष्कर्ष पडताळून पाहण्यात येऊन अभ्यास विषयाची यशस्विता अभ्यासली जाणार आहे.

संदर्भ ग्रंथ:-

1. Dr. Babasheb Ambedkar Written by dhananjay kir 1981 3rd Edition.

2. Lokrajay – Oct. 2006

3. आंबेडकरांच्या सामजिक आणि राजकीय चळवळी कृष्ण मेणसे, लोकवाङ्मय गृह प्रकाशन.

4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन व त्यांचे शैक्षणिक कार्य ………..प्रवीण भास्कर

5. डॉ. फाडके भालचंद्र- फुले आंबेडकर शोध आणि बोध, आनंद प्रकाशन औरंगाबाद आवृत्ती 1985

6. डॉ. आ. ह. साळुंखे – हिंदु संस्कृती आणि स्त्री लोकवाङ्मयगृह, मुंबई

7. दया पवार – डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र शासन द्वारा प्रकाशित

8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक विचार : शंकरराव खरात